क) **विनाअनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी** त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५१% प्रवेश त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना तसेच उर्वरित जागांवर बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

तसेच उर्वरित जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांमधून भरतांना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या स्वेच्छेने समाजातील अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, भटक्या जाती विमुक्त जाती विशेष प्रवर्ग इ. दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागाप्रमाणे प्रवेश देता येईल.

ड) **प्रवेशासाठी वृतपत्रात जाहिरात देणे** :- सर्व भाषिक व धार्मिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी उच्च, तांत्रिक अथवा व्यावसायिक पदवी/पदविका अभ्यासक्रमाकरिता अल्पसंख्यांक कोटयातील उपलब्ध सर्व जागा (विनाअनुदानित ५१ % जागा व अनुदानित ५० % जागा यथास्थिती) नियमानुसार भरण्यासाठी कमीत कमी चार मुख्य वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक राहील. सदर चार जाहिरातीपैकी दोन जाहिराती राज्य स्तरावरील, दोन जाहिराती राष्ट्रिय स्तरावरील तसेच एक मराठी, दोन इंग्रजी, संबंधित भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्रदान असणाऱ्या अल्पसंख्यांक भाषेत ही जाहिरात कमीत कमी ८x८ म्हणजे ६४ स्क्वेअर सेंटीमीटर आकारात पुढे नमूद केलेल्या बाबींचा समावेश करुन जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक राहील. १२ वी चा निकाल लागताच पहिली जाहिरात इंग्रजी व मराठी / संबंधित संस्थेस दर्जा प्राप्त अल्पसंख्यांक भाषेत व दुसरी जाहिरात त्यानंतर १० दिवसांनी इंग्रजी व मराठी / संबंधित भाषेत प्रसिध्द करावी. (जाहिरात ***प्रसिध्दी अशासकीय संस्थाच्या संघटनेमार्फत एकत्रितपणे न देता ती प्रत्येक संस्थेने/ महाविद्यालयाने स्वतंत्रपणे देणे आवश्यक राहील.)*** सदर जाहिरात मजकुर प्रपत्र-४ प्रमाणे असावा.

इ) सर्व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या मार्फत चालविण्यात येणा-या उच्च, तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व प्रवेशाची माहिती या निर्णयासोबतच्या *प्रपत्र-५* नुसार प्रवेश क्षमता, अल्पसंख्याकाकरीता राखीव जागा इ. प्रवेशासाठी अर्ज केलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची यादी, प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी, त्यामध्ये अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची यादी याबाबतची माहिती संबंधित संस्थेने त्यांच्या संकेतस्थळावर देणे बंधनकारक आहे. प्रती वर्षी तांत्रिक व व्यावसायिक

iii) अल्पसंख्याक **विद्यालयात अल्पसंख्याकांना प्रवेश देण्याबाबत** :- अनुदानित व विना अनुदानित अल्पसंख्यांक संस्थांनी विहित कालमर्यादेत गुणवत्तेनुसार पारदर्शक प्रवेश प्रक्रियेद्वारे, त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहाच्या सर्व पात्र अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश दिले पाहिजेत आणि कोणत्याही पात्र अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचा अर्ज संस्थेने नाकारता कामा नये. विनाअनुदानित शाळांना काही प्रमाणात बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना सुध्दा प्रवेश देता येईल व अनुदानित शाळांनी स्थानिक गरजांनुसार वाजवी प्रमाणात बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना देखील प्रवेश देणे अनिवार्य आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या राईट ऑफ चिल्डेंन टू फ्री ॲन्ड कम्पलसरी एज्युकेशन ॲक्ट,२००९ च्या कलम (१) मधील तरतुदीनुसार कायम विनाअनुदानित अल्पसंख्याक शाळांना पहिली तसेच पूर्व प्राथमिक वर्गांच्या प्रवेशासाठी २५ टक्के वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक नाही. तथापि, कायम विनाअनुदानीत अल्पसंख्याक शाळांनी आपल्या इच्छेनुसार अल्पसंख्याक वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

iv) **अल्पसंख्यांक संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या उच्च, तांत्रिक अथवा व्यावसायिक शैक्षणिक संस्थांत अल्पसंख्याकांना प्रवेश देणेबाबत** :- पदवी / पदविका व पुढे

अ) सर्व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा गुणवत्तेद्वारे पारदर्शक पध्दतीने प्रवेश करावेत.

ब) **अनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी** त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५० % जागांवर त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहाच्या विद्यार्थ्यांना तसेच उर्वरित ५० % जागांवर बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

तसेच ५०% जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांमधून भरताना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक विभागांनी समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग इ.दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागाप्रमाणे प्रवेश देणे बंधनकारक आहे.

## प्रपत्र - ४

अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी अल्पसंख्याक कोट्यातील जागा भरण्याकरीता जाहिरातीचा नमुना किमान ८ x ८ से.मी.

ट्रस्टचे / संस्थेचे नांव संचलित
कॉलेजचे नांव व पत्ता

**शैक्षणिक वर्ष २० - करीता खालील अभ्यासक्रमांच्या --------धार्मिक / भाषिक अल्पसंख्यांक कोटयातील जागा भरण्याकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| अ. क्र. | शाखा / अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता | अल्पसंख्यांक कोटयातील जागा | बिगर अल्पसंख्यांक कोटयातील जागा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

- **अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेचे प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक**

१. अर्ज करण्याचा अंतिम दिनांक : -
२. गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक : -
३. प्रवेशाचा दिनांक : -

प्रवेश अर्ज --------- ठिकाणी रु. /- चा रोख / डी.डी. जमा केल्यानंतर प्राप्त होईल.

**संस्थेचे संकेतस्थळ ई-मेल -**
**दुरध्वनी क्रमांक**

**प्राचार्य**
**संस्थेचे नांव**

अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेकरीता संबंधित प्राधिकारी यांनी निश्चित केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर (after cut off date) दोन आठवडयात अल्पसंख्यांक विकास विभागास वरीलप्रमाणे माहिती सादर करावी व अल्पसंख्याक विकास विभागाचे portal वर submit करावी.

**ई) बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेशाची परवानगी देणेबाबत :-** उपरोक्त प्रमाणे जाहिरात देऊन देखील अल्पसंख्यांक कोटयातील आवश्यक विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत तर अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त **अनुदानित व विनाअनुदानित डी.एड., बी.एड., व्यावसायिक व तांत्रिक शैक्षणिक संस्थांनी या जागा गुणवत्तेनुसार बिगर अल्पसंख्यांक उमेदवारांमधून भरण्याकरिता प्रपत्र ४ व ५ प्रमाणे तसेच भाग-अ मधील परिच्छेद-१० (iv) प्रमाणे कार्यवाही करुन दिलेल्या ४ जाहिरातीची झेरॉक्स् प्रत सहित अर्ज करुन अल्पसंख्याक विकास विभागाची विनिर्दिष्ट पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.** सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर उपरोक्त संस्थेस बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थी भरण्यास या विभागाकडून मान्यता देण्यात येईल. **संबंधित प्राधिकरणाने डीएड, बीएड, तंत्रशिक्षण व वैद्यकीय शिक्षण या अभ्यासक्रमांना अल्पसंख्यांक विभागाच्या पुर्व परवानगी शिवाय अल्पसंख्यांक कोटयातील जागांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश करु नये.**

फ) अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित डीएड, बीएड, व्यावसायिक व तांत्रिक शैक्षणिक शैक्षणिक संस्थांनी सलग तीन शैक्षणिक वर्षात अल्पसंख्यांक कोटयात उपलब्ध असलेल्या ५०%/५१% जागाच्या बदल्यात अल्प प्रमाणात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश दिले तर, अशा शैक्षणिक संस्थांचा अल्पसंख्यांक दर्जा रद्द करणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

## भाग ब

## अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्राकरीता अर्ज करण्याची ऑनलाईन कार्यपध्दती

१) ऑन लाईन अर्ज करणे :-

i) धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्यांक दर्जा मान्यता मिळणेकरिता इच्छूक संस्थांनी www.mdd.maharashtra.gov.in या पोर्टलवर online अर्ज सादर भरावा.अर्ज भरतेवेळी अर्जदारांनी स्वत:चा user name आणि password तयार करावा व अर्जात भरावा. अर्जदाराने user name आणि password याची नोंद पुढिल कार्यवाही साठी जतन करुन ठेवावी.

प्रपत्र - ५

डी.एड., बी.एड., तांत्रिक व व्यावसायिक मान्यताप्राप्त अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी खालील माहिती त्यांच्या संकेतस्थळावर प्रति वर्षी सादर करावी तसेच त्यानंतर दोन आठवड्याच्या आत अल्पसंख्याक विकास विभागाच्या पोर्टल (portal) वर भरावी.

अ) अल्पसंख्याक संस्थेने केलेल्या प्रवेशाबाबतची माहिती :-

संस्थेचे नांव :-

महाविद्यालयाचे नांव :-

शैक्षणिक वर्ष :-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | मंजूर प्रवेश क्षमता | अल्पसंख्याक कोटा (अनुदानित संस्था : ५० % विना - अनुदानित : ५१%) | अल्पसंख्याक कोटया तील भरण्यात आलेल्या जागा | अल्पसंख्याक कोटया तील शिल्लक / रिक्त जागा | अल्पसंख्याक कोटयातून भरण्यात आलेल्या जागांची टक्केवारी | अल्पसंख्याक कोटयातील शिल्लक / रिक्त जागा बिगर अल्पसंख्याक उमेदवारा तून भरण्यास मान्यता दिली होती किंवा कसे असल्यास आदेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

ब) अल्पसंख्याक कोटयातील जागा भरण्याच्या दृष्टीने संस्थेने केलेल्या प्रयत्नांचा तपशिल

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नांव | भाषा | जाहिरातीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |
| | | | |

क) अल्पसंख्याक कोटयातील प्रवेशाची माहिती

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | अर्ज प्राप्त विद्यार्थ्यांचे नावे | अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेशीत विद्यार्थ्यांची नांवे | प्रवेश नाकारलेल्या विद्यार्थ्यांची नांवे | प्रवेश न देण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

-*-*-*-*-